महानगरपालिकांच्या सार्वत्रिक निवडणुका फेब्रुवारी, २०१७
(बृहन्मुंबई, ठाणे, उल्हासनगर, पुणे, पिंपरी-चिंचवड,
सोलापूर, नाशिक, अकोला, अमरावती व नागपूर- एकूण १०)
प्रत्यक्ष निवडणूक कार्यक्रम

# राज्य निवडणूक आयोग, महाराष्ट्र

निवडणूक प्राथम्य
ई-मेल

क्रमांक-रानिआ/मनपा-२०१७/प्र.क्र.२/का.५,
नवीन प्रशासन भवन, हुतात्मा राजगुरु चौक,
मादाम कामा रोड, मुंबई ४०० ०३२
दिनांक:- ११/०१/२०१७.

प्रति,

आयुक्त,
बृहन्मुंबई, ठाणे, उल्हासनगर, पुणे, पिंपरी-चिंचवड,
सोलापूर, नाशिक, अकोला, अमरावती व नागपूर महानगरपालिका (एकूण १०)

विषय :- राज्यातील १० महानगरपालिकांची सार्वत्रिक निवडणूक फेब्रुवारी-२०१७
प्रत्यक्ष निवडणूक कार्यक्रम...

संदर्भ :- १. राज्य निवडणूक आयोगाचे समक्रमांकाचे दि.०२/०१/२०१७ चे पत्र.
२. राज्य निवडणूक आयोगाचे समक्रमांकाचे दि.१०/०१/२०१७ चे आदेश.

महोदय,

राज्य निवडणूक आयोगाच्या संदर्भाधीन क्रमांक १ च्या पत्रान्वये बृहन्मुंबई, ठाणे, उल्हासनगर, पुणे, पिंपरी-चिंचवड, सोलापूर, नाशिक, अकोला, अमरावती व नागपूर या १० महानगरपालिकांच्या सार्वत्रिक निवडणुका घेण्याकरिता पूर्वतयारी करण्याबाबत सविस्तर सूचना देण्यात आलेल्या आहेत. सदर महानगरपालिकांच्या सार्वत्रिक निवडणुकांकरिता प्रत्यक्ष निवडणुकीचा कार्यक्रम मा. राज्य निवडणूक आयुक्त यांनी दि. ११/०१/२०१७ रोजी दुपारी ४.०० वाजता पत्रकार परिषदेमध्ये पुढे नमूद केलेल्या परिशिष्ट १ व २ प्रमाणे जाहीर केलेला आहे :-

| अ.क्र. | महानगरपालिका | निवडणूक कार्यक्रम |
|---|---|---|
| १ | बृहन्मुंबई | परिशिष्ट - १ नुसार |
| २ | ठाणे, उल्हासनगर, पुणे, पिंपरी-चिंचवड, सोलापूर, नाशिक, अकोला, अमरावती व नागपूर (एकूण ९ महानगरपालिका) | परिशिष्ट - २ नुसार |

२. उपरोक्त १० महानगरपालिकांच्या सार्वत्रिक निवडणुकांची आचारसंहिता हा निवडणूक कार्यक्रम घोषित झाल्याच्या वेळेपासून लागू झाली असून ती निवडणूकीचा निकाल जाहीर होईपर्यन्त अंमलात राहील.

वरील आचारसंहिता संपूर्ण महानगरपालिका क्षेत्रामध्ये लागू राहील. मात्र महानगरपालिका क्षेत्र वगळता जर अन्य क्षेत्रात स्थानिक स्वराज्य संस्थांच्या निवडणुकांची आचारसंहिता लागू नसेल तर त्या क्षेत्रात नेहमीप्रमाणे सर्व कामे व अनुषंगिक बाबी करण्यावर कोणतेही निर्बंध असणार नाहीत. परंतु, निवडणुका असलेल्या महानगरपालिकेतील मतदारांवर विपरीत प्रभाव टाकणारी कोणतीही कृती / घोषणा संबंधित स्थानिक स्वराज्य संस्था वा मंत्री, खासदार, आमदार वा कोणत्याही पदाधिकाऱ्यांना करता येणार नाही.

३. या निवडणुकांकरिता संदर्भाधीन क्रमांक २ च्या आदेशान्वये दि.०५/०१/२०१७ हा दिनांक मतदार यादी ग्राह्य धरण्याचा दिनांक म्हणून अधिसूचित करण्यात आलेला आहे. सदर आदेशाची प्रत सोबत पाठविण्यात येत आहे.

४. महानगरपालिकांची प्रभागरचना तसेच मतदारयादीसंदर्भात विविध न्यायालयात याचिका दाखल करण्यात आल्या आहेत. त्यापैकी काही याचिकांमध्ये "निवडणूक कार्यक्रम जाहीर करण्यात आल्यास तो रिट याचिकेवरील निर्णयाच्या अधीन राहून असेल" असे मा. न्यायालयाने आदेश दिले आहेत, त्यामुळे यासंदर्भात योग्यती टिपणी निवडणूक कार्यक्रमाच्या अधिसूचनेत नमूद करणे आवश्यक आहे. तरी याबाबतची खातरजमा करून न्यायालयाच्या आदेशानुसार आवश्यक कार्यवाही करण्याची संपूर्ण जबाबदारी संबंधित महानगरपालिका आयुक्त यांची राहील. तसेच मा न्यायालयाचे कोणत्याही रिट याचिकेमध्ये स्थगिती आदेश प्राप्त झाल्यास निवडणूक कार्यक्रम स्थगित करण्यात यावा.

५. राज्य निवडणूक आयोगाच्या संदर्भाधीन क्र.१ येथील दि.०२/०१/२०१७ च्या पत्रातील सूचनांनुसार काटेकोरपणे कार्यवाही करण्यात यावी.

मा. राज्य निवडणूक आयुक्त यांच्या आदेशानुसार,

आपला,

१७/१/१७

( नि.ज.वागळे )

अवर सचिव ,

राज्य निवडणूक आयोग, महाराष्ट्र

सहपत्र - परिशिष्ट- १, २ व,
संदर्भाधीन क्र.२ चे आदेश.

प्रत :-

१) मुख्य सचिव, महाराष्ट्र शासन, मंत्रालय, मुंबई ३२
२) अपर मुख्य सचिव, गृह विभाग, मंत्रालय, मुंबई ३२
३) अपर मुख्य सचिव / प्रधान सचिव / सचिव, सर्व मंत्रालयीन विभाग
४) मुख्य निवडणूक अधिकारी, सामान्य प्रशासन विभाग, मंत्रालय, मुंबई ३२
५) सचिव(२), नगरविकास विभाग, मंत्रालय, मुंबई ३२
६) पोलिस महासंचालक, महाराष्ट्र राज्य, मुंबई
७) सर्व विभागीय आयुक्त
८) पोलिस आयुक्त, मुंबई, ठाणे, पुणे, सोलापूर, नाशिक, अमरावती व नागपूर
९) जिल्हा पोलिस अधिक्षक, पुणे, अकोला
१०) संचालक, शासकीय मुद्रण व लेखनसामग्री संचालनालय, चर्नी रोड, मुंबई ४
११) राज्य निवडणूक आयोगाच्या पॅनलवरील सर्व वकील
१२) सहायक आयुक्त, संगणक कक्ष
१३) माहिती व जनसंपर्क अधिकारी, राज्य निवडणूक आयोग, मुंबई
१४) राज्य निवडणूक आयोगाच्या कार्यालयातील सर्व कार्यासने
१५) निवड नस्ती (का.५), राज्य निवडणूक आयोग

# बृहन्मुंबई महानगरपालिकेच्या सार्वत्रिक निवडणुकीचा कार्यक्रम-२०१७

| अ.क्र. | निवडणुकीचा टप्पा | टप्पा सुरु करण्याची / पूर्ण करण्याची तारीख |
|---|---|---|
| | मतदार यादी ग्राह्य धरण्याचा दिनांक | ०५/०१/२०१७ (गुरुवार) |
| १ | आयुक्त, महानगरपालिका यांनी निवडणूक कार्यक्रमाची सूचना शासन राजपत्र व स्थानिक वृत्तपत्रात प्रसिध्द करण्याची तारीख | २७/०१/२०१७ (शुक्रवार) |
| २ | नामनिर्देशनपत्र राज्य निवडणूक आयोगाने निश्चित केलेल्या वेबसाईटवर भरण्याकरिता उपलब्ध असण्याचा कालावधी | २७/०१/२०१७ (शुक्रवार) सकाळी ११.०० ते ०३/०२/२०१७ (शुक्रवार) दु.४.०० पर्यंत |
| ३ | वरील नामनिर्देशनपत्र स्विकारण्याचा कालावधी | २७/०१/२०१७ (शुक्रवार) ते ०२/०२/२०१७ (गुरुवार) (सकाळी ११.०० ते दु.४.००)<br>दि.०३/०२/२०१७ (शुक्रवार) (सकाळी ११.०० ते सायं.५.००)<br>**( रविवार दि.२९/०१/२०१७ रोजी नामनिर्देशनपत्रे स्विकारण्यात येणार नाहीत.)** |
| ४ | नामनिर्देशनपत्रांची छाननी | ०४/०२/२०१७ (शनिवार) (सकाळी ११.०० वाजल्यापासून) |
| ५ | वैधरित्या नामनिर्देशित झालेल्या उमेदवारांची यादी प्रसिध्द करण्याचा दिनांक | छाननी पूर्ण झाल्यानंतर लगेच |
| ६ | उमेदवारी मागे घेण्याचा अंतिम दिनांक | ०७/०२/२०१७ ( मंगळवार) (दुपारी ४.०० पर्यंत)<br>**(रविवार दि.०५/०२/२०१७ रोजी उमेदवारी मागे घेता येणार नाही.)** |
| ७ | निवडणूक चिन्ह नेमून देण्याचा दिनांक | ०८/०२/२०१७ (बुधवार) (सकाळी ११.०० पासून) |
| ८-अ | अंतिमरित्या निवडणूक लढविणाऱ्या उमेदवारांची यादी प्रसिध्द करण्याचा दिनांक | ०८/०२/२०१७ (बुधवार) |
| ८-ब | मतदान केंद्रांची यादी प्रसिध्द करणे | ०८/०२/२०१७ (बुधवार) |
| ८-क | महानगरपालिका आयुक्त किंवा त्यांनी प्राधिकृत केलेल्या अधिकाऱ्याने मतदान केंद्रनिहाय मतदार यादी प्रसिध्द करणे | ०८/०२/२०१७ (बुधवार) |
| ९ | आवश्यक असल्यास मतदानाचा दिनांक | २१/०२/२०१७ (मंगळवार) (सकाळी ७.३० ते संध्याकाळी ५.३० पर्यंत) |
| १० | मतमोजणी व निकाल जाहीर करण्याचा दिनांक | २३/०२/२०१७ (गुरुवार) (सकाळी १०.०० पासून) |
| ११ | महाराष्ट्र शासन राजपत्रात निकाल प्रसिध्द करणे | २८/०२/२०१७ (मंगळवार) पर्यंत |

राज्य निवडणूक आयुक्त यांच्या आदेशानुसार,

( नि.ज.वागळे )
अवर सचिव ,
राज्य निवडणूक आयोग, महाराष्ट्र

राज्य निवडणूक आयोगाचे पत्र क्रमांक-रानिआ/मनपा २०१७/प्र.क्र. २ /का.५, दि. ११/०१/२०१७ सोबतचे सहपत्र

परिशिष्ट-२

## ९ महानगरपालिकांच्या (बृहन्मुंबई वगळून) सार्वत्रिक निवडणुकांचा कार्यक्रम-२०१७
## (ठाणे, उल्हासनगर, पुणे, पिंपरी-चिंचवड, नाशिक, सोलापूर, अकोला, अमरावती व नागपूर )

| अ.क्र. | निवडणुकीचा टप्पा | टप्पा सुरु करण्याची / पूर्ण करण्याची तारीख |
|---|---|---|
| | मतदार यादी ग्राह्य धरण्याचा दिनांक | ०५/०१/२०१७ (गुरुवार) |
| १ | आयुक्त, महानगरपालिका यांनी निवडणूक कार्यक्रमाची सूचना शासन राजपत्र व स्थानिक वृत्तपत्रात प्रसिध्द करण्याची तारीख | २७/०१/२०१७ (शुक्रवार) |
| २ | नामनिर्देशनपत्र राज्य निवडणूक आयोगाने निश्चित केलेल्या वेबसाईटवर भरण्याकरिता उपलब्ध असण्याचा कालावधी | २७/०१/२०१७ (शुक्रवार) सकाळी ११.०० ते ०३/०२/२०१७ (शुक्रवार) दु.२.०० पर्यंत |
| ३ | वरील नामनिर्देशनपत्र स्विकारण्याचा कालावधी | २७/०१/२०१७ (शुक्रवार) ते ०३/०२/२०१७ (शुक्रवार) (सकाळी ११.०० ते दु.३.००) **( रविवार दि.२९/०१/२०१७ रोजी नामनिर्देशनपत्रे स्विकारण्यात येणार नाहीत.)** |
| ४ | नामनिर्देशनपत्रांची छाननी | ०४/०२/२०१७ (शनिवार) (सकाळी ११.०० वाजल्यापासून) |
| ५ | वैधरित्या नामनिर्देशित झालेल्या उमेदवारांची यादी प्रसिध्द करण्याचा दिनांक | छाननी पूर्ण झाल्यानंतर लगेच |
| ६ | उमेदवारी मागे घेण्याचा अंतिम दिनांक | ०७/०२/२०१७ ( मंगळवार) (दुपारी ३.०० पर्यंत) **(रविवार दि.०५/०२/२०१७ रोजी उमेदवारी मागे घेता येणार नाही.)** |
| ७ | निवडणूक चिन्ह नेमून देण्याचा दिनांक | ०८/०२/२०१७ (बुधवार) (सकाळी ११.०० पासून) |
| ८-अ | अंतिमरित्या निवडणूक लढविणाऱ्या उमेदवारांची यादी प्रसिध्द करण्याचा दिनांक | ०८/०२/२०१७ (बुधवार) |
| ८-ब | मतदान केंद्रांची यादी प्रसिध्द करणे | ०८/०२/२०१७ (बुधवार) |
| ८-क | महानगरपालिका आयुक्त किंवा त्यांनी प्राधिकृत केलेल्या अधिकाऱ्याने मतदान केंद्रनिहाय मतदार यादी प्रसिध्द करणे | ०८/०२/२०१७ (बुधवार) |
| ९ | आवश्यक असल्यास मतदानाचा दिनांक | २१/०२/२०१७ (मंगळवार) (सकाळी ७.३० ते संध्याकाळी ५.३० पर्यंत) |
| १० | मतमोजणी व निकाल जाहीर करण्याचा दिनांक | २३/०२/२०१७ (गुरुवार) (सकाळी १०.०० पासून) |
| ११ | महाराष्ट्र शासन राजपत्रात निकाल प्रसिध्द करणे | २८/०२/२०१७ (मंगळवार) पर्यंत |

राज्य निवडणूक आयुक्त यांच्या आदेशानुसार,

( नि.ज.वागळे )
अवर सचिव ,
राज्य निवडणूक आयोग, महाराष्ट्र